# महाराष्ट्र शासन

## जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जालना

ई–निविदा कार्यप्रणाली निविदा सूचना क्र. जिल्हा विधी सेवा प्राधिकरण जालना अंतर्गत (दुरध्वनी क्रमांक ०२४८२–२२३६२५) येथे दोन वर्षे मुदतीच्या कालावधीकरीता लिपीक–टंकलेखक व शिपाई पदांच्या कंत्राटी पध्दतीने सेवा उपलब्धतेसाठी ई–निविदा प्रणालीव्दारे पात्र निविदाकारांकडून ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र | कामाचे ठिकाण | कामाचे स्वरुप | शासन निर्णयाप्रमाणे पद संख्या | कामाची अंदाजीत रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| १ | जिल्हा विधी सेवा प्राधिकरण जालना | जिल्हा विधी सेवा प्राधिकरणांतर्गत कामकाजामध्ये मदत करणे, या कामांकरीता लिपीक टंकलेखक या पदाच्या सेवा बाहय यंत्रणेव्दारे कंत्राटी पध्दतीने उपलब्ध करुन देणे | पदसंख्या लिपीक टंकलेखक –४ | ३४,९२,२८८/– |
| २ | जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जालना | जिल्हा विधी सेवा प्राधिकरण कार्यालया मध्ये कार्यालयाची स्वच्छता करणे टपाल वाटप करणे इत्यादी या कामाकरीता शिपाई या पदाच्या सेवा बाहय यंत्रणेव्दारे कंत्राटी पध्दतीने उपलब्ध करुन देणे | पदसंख्या शिपाई–१ | ६,७५,०००/– |
| | | | एकुन | ४१,६७,२८८/– |

टिप : १. सदरची निविदा ही जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जालना येथील लिपीक टंकलेखक व शिपाई या पदांकरिता एकत्रित समजण्यात यावी.

२. सदरची निविदा भरताना एकत्रित निविदा बयाना रक्कम रू. ५००००/– नेटबॅकिंग प्रणालीने भरावयाची आहे.

३. निविदा फी रु. ३,०००/– नेट बॅकिंग प्रणालीने भरावयाची आहे.

४. ई निविदा पोर्टलवर बीड लॉक झाल्यानंतर निविदांबाबत हार्ड कॉपी सत्यप्रतिसह एका प्रतीत कंत्राटदारांनी निविदा सादर करावयाच्या वेळेपासून ७२ तासात सादर करणे अनिर्वाय आहे.

५. निविदेची एकून रक्कम ४१,६७,२८८–(दोन वर्षाच्या जीएसटी करासह व कामगार विमासह)

६. सुक्ष्म लघु व मध्यम उदयोग विकास अधिनियम २००६ अंतर्गत उत्पादक उदयोगांना व शासकीय मंडळ/महामंडळ/उपक्रमा अंतर्गत नोंदणीकृत असलेले उत्पादक व पुरवठादार यांना निविदेमध्ये निविदा शुल्क रक्कम भरण्यापासून सूट देण्यात येत आहे.

७.लिपीक टंकलेखकची सेवा कुशल गटात व शिपाई पदाची सेवा अकुशल गटात असेल

## निविदेचे वेळापत्रक :

| | |
|---|---|
| निविदा डाउनलोड करण्याचा कालावधी | १२/०३/२०२५ वेळ १०—०० ते २६/०३/२०२५ वेळ १७—०० |
| तांत्रीक निविदा उघडण्याचा दिनांक व मुळ दस्तऐवज सादर करण्याचा दिनांक | २७/०३/२०२५ १७—०० वाजता |
| निविदापूर्वक परिषद/बैठकीची तारीख | २८/०३/२०२५ सायंकाळी ५—१५ वाजता |
| निविदापुर्व परिषद/बैठकीचे ठिकाण | मा.प्रमुख जिल्हा न्यायाधीश जालना यांचे निजिकक्षामध्ये |
| तांत्रीक निविदा उघडण्याचे ठिकाण | मा.प्रमुख जिल्हा न्यायाधीश जालना यांचे निजिकक्षामध्ये |
| आर्थिक निविदा उघडयाचा दिनांक | तांत्रीक निविदेतील कागदपत्रांची पडताळणी झाल्यानंतर आर्थिक निविदा उघडणेबाबत निविदाधारकांना कळविणेत येईल. |

टिप:

१ सर्व पात्र/इच्छुक निविदाकरांनी निविदापत्रक डाउनलोड करण्यासाठी निविदा प्रक्रियेत भाग घेण्यासाठी ई निविदा प्रणालीच्या mahatenders.gov.in वर enrolled करणे आवश्यक आहे.

२. निविदाकारांना वर नमूद केलेल्या संकेतस्थळावर ऑनलाईन देयक भरणे संदर्भात व डिजीटल प्रमाणपत्र वितरीत करण्यासंदर्भात काही शंका/अडचणी असल्यास त्यांनी खालील दुरध्वनी कमांकावर संपर्क साधावा ०२४८२—२२३६२५

३. निविदाकारांनी निविदा संदर्भात सर्व दस्तऐवज ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहील तसेच इसार रक्कम अथवा निविदा बयाणा रक्कम online बयाणा पध्दतीने भरणेची आहे. सदर बयाणा रक्कम http://mahatendrs.gov.in या संकेतस्थळावरही भरता येईल. अन्यथा ऑनलाईन निविदा उघडण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

४ संस्था नोंदणीकृत असावी आणि वस्तु व सेवा कर भरणारी असावी.

५. इतर अटी व शर्ती ई—निविदा नमुन्यामध्ये पहावयास मिळतील. सदर कामांची एक अथवा सर्व ई— निविदा कोणतेही कारण न देता रद्द करण्याचे अधिकार सक्षम अधिकारी यांनी राखून ठेवलेले आहेत.

६. वरिल निविदा http://mahatendrs.gov.in वरिल या वेबसाईटवर पहायला मिळेल

७. १. शासन निर्णय विधी व न्याय विभाग कमांक पदनि २५१२/प्र.क्र.१५७/का.१२ दिनांक २६/२/२०१३,

२. वित्त विभाग शासन निर्णय कमांक पदनि—२०१३/प्र.क्र. ११२/१३/वित्तीय सुधारणा—१ दिनांक २/१२/२०१३,

३. उदयोग उर्जा व कामगारविभाग शासन निर्णय कमांक काआआ—२०१३/प्र.क्र. २३३/कामगार—८ दिनांक १८/६/२०१४

४. विधी व न्याय विभाग शासन निर्णय, ३ सप्टेंबर,२०१४,

५. विधी व न्याय विभाग शासन निर्णय दि २७ जानेवारी, २०१५,

६. विधी व न्याय विभाग शासन शुध्दीपत्रक कमांक पदनि २५१२/प्र.क. १५७/का.१२ दिनांक ३/२/२०१५,

७. विधी व न्याय विभाग शासन निर्णय क्रमांक कंत्राटी–२०१६/प्र.क्र. १५७/का. १२, दि.२३ फेब्रुवारी २०१७

८. विधी व न्याय विभाग शासन निर्णय क्रमांक : कंत्राटी २०१६/प्र.क्र. १९४/का. १२ दि. ९ ऑगस्ट,२०१७

९. वित्त विभाग शसन परिपत्रक क्र.: पदनि–२०१६/प्र.क्र. २९/१६/वित्तीय सुधारणा–१ २ ऑगस्ट,२०१६.

१०. वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक–पदनि–२०२२/प्र.क्र १५/आ.पु.क दि. २७ एप्रिल,२०२२ या शासन निर्णयांच्या अधिन राहुन निविदा भरणेची आहे.

अध्यक्ष

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण जालना

## अटी व शर्ती

बयाना रक्कम (Earnest Money Deposit)- (Technical Bid envelop)

खालील नमुद केलेल्या बाबीची पुर्तता निविदाकराकडून न झाल्यास सदर निविदाकाराची बयाना रक्कम जप्त करण्याचे अधिकार या कार्यालयास राहतील.

अ. निविदा स्वीकारण्याच्या अंतिम दिनांकानंतर निविदा किंवा प्रस्ताव मागे घेणे किंवा त्यात फेरफार करणे.

ब करारावर सही न करणे

क निविदा किंवा प्रस्ताव स्वीकारण्यात आल्यानंतर करारानुसार कामगिरीसाठी आवश्यक सुरक्षा अनामत न भरणे

ड निविदा दस्तावेजामध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे करारावर सही करण्यापुर्वी कोणत्याही अन्य अटीची पुर्तता न करणे

**अनामत रक्कम**

यशस्वी निविदाकाराला निविदा रक्कमेच्या ४ टक्के अनामत रक्कमेचा राष्ट्रीयकृत बॅंकेचा डिमांड ड्राफ्ट सदस्य सचिव जिल्हा जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जालना या नावे जमा करावा लागेल.

**निविदा प्रक्रिया**

संपुर्ण निविदा प्रक्रिया ऑनलाईन ई–निविदा असुन ती तांत्रीक निविदा लखोटा (Technical Bid Envelop ) व आर्थिक निविदा लखोटा (Financial Bid Envelop) अशा दोन लखोटा पध्दतीत राहील.

**अ) तांत्रीक निविदा**

१ निविदा अर्जाचे शुल्क व बयाणा रक्कमेचा भरणा शासकीय नियमाप्रमाणे केला असणे आवश्यक (Tender Form Fee & E.M.D )

२. कंपनीचे /संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र (Registration Certificate )

३. पॅन कार्ड (Pan Card)

४. मागील तीन वर्षाचे आयकार प्रमाणपत्र व ताळेबंद उदा. सन २०२१–२०२२ ते २०२३–२०२४

५. प्रोफेशनल टॅक्स (Professional Tax) प्रमाणपत्र

६. सेवा कर (GST Registration )प्रमाणपत्र

७. निविदाकाराने लिपीक टंकलेखक व शिपाई यांची सेवा केंद्र शासन/महाराष्ट्र शासन वा इतर अन्य आस्थापनांमध्ये पुरविली असल्यास याबाबतचे संबंधित कार्यालयाने जारी

केलेले कार्यादेश आणि कामाच्या अनुभवाचे प्रमाणपत्र सादर करावे (Experience Certificate)

८. ई.पीं. एफ. (Employees Provident Fund ) नोंदणी प्रमाणपत्र

९ ई.एस.आय.एस. (Employees State Insurance Scheme ) नोंदणी प्रमाणपत्र

१०. कामगार परवाना (Labour Licenses )नोंदणी प्रमाणपत्र

११. निविदा अटी व शर्तींवर निविदाकरांची सही व शिक्का

१२. **शैक्षणिक पात्रता— लिपीक टंकलेखक— या पदाकरिता शैक्षणिक पात्रता पुढीलप्रमाणे राहील.**

i) कोणत्याही शाखेचा अधिकृत विदयापीठातून उत्तीर्ण झालेला पदवीधर.

ii) must have passed Government Commercial Examination or Examination conducted by Government Board or Government Certificate in Computer Typing Basic Course (GCC-TBC) or I.T.I. for a) English Typing with speed of 40 w.p.m. and b) Marathi Typing with speed of 30 w.p.m.

iii) must possess Computer certificate about proficiency in operation of word processors in Windows and Linux in addition to M.S. Office, M.S. Word, Wordstar-7 and Open Office Org. obtained from any of the following Institutes:
a) Universities established under the Maharashtra Universities Act,1994;
b)Goa/Maharashtra State Board of Technical Education;
c)NIC;
d)DOEACC;
e)APTECH;
f)NIIT;
g)C-DAC;
h)DATAPRO;
i)SSI;
j)BOSTON;
k)CEDIT;
l)MS-CIT.

१३. कामाचे स्वरूप (लिपीक टंकलेखक पदासाठी)

१. आवक—जावक नोंदवही संबंधित कामकाज

२. पोस्टल स्टॅम्पसंबंधित कामकाज पाहणे व लेखाजोखा ठेवणे

३. भारतीय डाक विभागाकडून किंवा कुरियरकडून पाठविण्यात आलेले वेगवेगळे टपाल आणि वस्तू व हजेरीपत्रकाशी संबंधित सर्व कामकाज करणे.

४. सर्व प्रकारच्या नोंदवहया लिहिणे, हाताळणे, तयार करणे व त्या संबंधीत सर्व कामकाज पाहणे.

५. सर्व प्रकारचे मासिक, त्रैमासिक, सहामाही, वार्षिक माहिती व विवरणपत्रे हस्तगत करणे, तयार करणे, एकत्रित करणे, तसेच सांख्यिकी विवरणपत्रे तयार करणे आणि या सर्व बाबतीत वेगवेगळे शासकीय कार्यालय, मा.महा.राज्य विधीसेवा प्राधिकरण, मुंबई, मा.उच्च न्यायालय, मुंबई, मा.जिल्हा न्यायालय, जालना व इतर तालुका विधीसेवा समिती यांना वेळोवेळी विहित कालावधीत पाठविणे.

६. जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या अधिका—यांनी सोपविलेली इतर कोणतेही कामकाज.

**१४. शिपाई पदासाठी शैक्षणिक पात्रता**

१. कोणत्याही शाखेचा अधिकृत विदयापीठातून उत्तीर्ण झालेला पदवीधर असणे आवश्यक आहे.

**१५. कामाचे स्वरूप**

**(१) शिपाई**—फर्निचर आणि यंत्रसामग्री सह संपूर्ण कार्यालयाचा (कचरा आणि धुळसाफ करणे). कागदपत्रे, कागदाची पुस्तके, तसेच पार्सल बाईंडिंग करणे. विविध विभाग आणि कार्यालयांना पत्रे/पार्सल वितरीत करणे. जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जालना यांचे अधिकारी/वरिष्ठ कर्मचारी यांनी सांगितलेले इतर कोणतेही काम.

तांत्रीक निविदेमध्ये नमूद केलेली सर्व कागदपत्रे वर दिलेल्या क्रमानेच सादर करण्यात यावी. तसेच अपलोड केलेल्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती तांत्रीक पडताळणीकरिता सादर करण्यात याव्यात. कंत्राटदाराने निविदा अर्जासोबत सदर प्रमाणपत्रे सादर न केल्यास, निविदा अर्ज निविदा प्रक्रियेतून बाद ठरविण्यात येईल.

सर्वप्रथम तांत्रीक, निविदा उघडण्यात येईल. तांत्रीक निविदा उघडतांना निविदाकार अथवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधी हजर राहणे आवश्यक आहे व त्यावेळेस त्यांनी प्रमाणपत्राच्या मुळ प्रती पडताळणीसाठी हजर ठेवणे आवश्यक आहे. जर निविदाकार तांत्रीक निविदेमध्ये नमुद केलेल्या बाबींची पुर्तता करीत नसेल तर त्यांची निविदा अपात्र ठरविण्यात येईल व सदर निविदाकाराची आर्थिक निविदा पुढील कार्यवाहीसाठी ग्राहय धरण्यात येणार नाही, पात्र ठरणा—या निविदाकारांचीच आर्थिक निविदा उघडण्यात येईल निविदेमध्ये नमुद केलेली निविदा स्विकारण्याची व उघडण्याची तारीख पुढील कार्यालयीन दिवस व नियोजीत वेळेस राहील

आर्थिक निविदेमधील रक्कम तांत्रीक निविदेमध्ये नमुद करण्यात येउ नये जर तसे आढळल्यास संबंधीत निविदाकाराची निविदा बाद ठरविण्यात येईल.

अ) आर्थिक निविदा

१. निविदेचे दर हे दरपत्रक (BOQ) यामध्ये सर्व करासहीत नमुद करावेत.

२. आर्थिक निविदेमध्ये निविदाकाराने नमुद केलेले दर निविदेमधील सर्व अटी व शर्तीची पुर्तता करीत असेल, तर पुढील कार्यवाहीसाठी निविदा ग्राहय धरण्यात येईल

३. निविदा स्विकारण्याचा आधिकार या कामासाठी नियुक्त केलेल्या निवड समितीला असतील व कोणतेही कारण न देता एक किंवा सर्व निविदा नाकारण्याचा आधिकार सदर समितीला असेल.

४. कंत्राटदारास त्यांनी नेमलेल्या कंत्राटी लिपीक टंकलेखक व शिपाई यांना किमान वेतन अधिनियम १९४८ मधील तरतुदीनुसार वेतन, इतर सवलती च सेवा शर्ती लागु करणे बंधनकारक असेल.

क) सर्वसाधारण अटी व शर्ती

१. कंत्राटदाराने कंत्राटी कामगारांना कामाचे वेतन व त्या अनुषंगीक इतर सर्व भत्ते रोख स्वरुपात आदा न करता संबंधीत कंत्राटी कामगारास त्याच्या बॅक खात्यात RTGS / NEFT द्वारे अदा करावेत.

२. कंत्राटदाराने कंत्राटी कामगारांना मिळणारे ई.पी.एफ व ई.एस.आय.सी यांची रक्कम प्रत्येक कंत्राटी कामगारांस मिळणा—या दरमहा रक्कमेनुसार अदा करावी.

३. कंत्राटदाराने कंत्राटी कामगारांना मिळणारे मुळ वेतन, इतर भत्ते, ई.पी.एफ व ई.एस. आय.सी यांचे प्रत्येक कंत्राटी कामगारांचे भरणा केलेले स्वतंत्र पगार प्रमाणपत्र दरमहा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणास सादर करणे अनिवार्य आहे.

४. कंत्राटदाराने कंत्राटी कामगाराला दिलेल्या ऑनलाईन देयकाचे तपशील दरमहा महिन्याच्या ७ तारखेच्या आत या कार्यालयास सादर करावे लागतील. जोपर्यंत कंत्राटदार वरील कागदपत्रे सादर करणार नाहीत, तोपर्यंत त्या महिन्याचे कंत्राटदाराचे देयक अदा करण्यात येणार नाही.

५. कंत्राटदाराने कंत्राटी कामगारांना मिळणा—या वेतनामध्ये दर ०६ महिन्यांनी विशेष भत्याच्या रक्कमेत होणाऱ्या वाढीनुसार वेतन देणे बंधनकारक राहील.

६. कंत्राटदाराने न्यायालयाचे कामकाजासाठी नेमलेल्या कंत्राटी कामगारांना किमान वेतन कायदयातील तरतुदीपेक्षा कमी वेतन अदा केल्याचे निदर्शनास आले, तर संबंधीत कंत्राटदारावर किमान वेतन कायदयातील तरतुदीप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल व त्याचे कंत्राट तात्काळ रद्द करुन त्यांचे नाव काळया यादीत टाकण्याची कार्यवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

७. कंत्राटाचा कालावधी कोणत्याही परिस्थितीत दोन वर्षापेक्षा जास्त राहणार नाही.

८. किमान वेतन कायदयातील तरतुदीनुसार कंत्राटदाराने कंत्राटी कामगारांना भरपगारी साप्ताहिक सुट्टी देणे बंधनकारक असेल व अशा सुट्टीचे दिवशी कार्यालयास कंत्राटी कामगारांच्या सेवेची आवश्यकता भासल्यास त्याचे ऐवजी दुसरा कामगार उपलब्ध करुन देण्याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदाराची असेल.

९. सुट्टीच्या दिवशी कंत्राटी कामगाराकडुन काम करुन घेतल्यास त्या दिवसाची बदली रजा देण्यात यावी. मात्र अशी बदली रजा देताना त्यादिवशी कार्यालयातील कामकाजाचा खोळंबा होवू नेये म्हणून दुस—या कामगाराची सोय करण्याची संपूर्ण जबाबदारी कंत्राटदाराची असेल.

१०. शासकीय कामाचे वेळेनंतर कंत्राटी कमागारांना जास्तीचे शासकीय काम करावे लागल्यास त्यांना अतिकालीन भत्ता देणे कंत्राटदारास बंधनकारक असेल व सदर अतिकालीन भत्ता देण्याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदाराची असेल.

११. कंत्राटदारास त्यांनी नेमलेल्या कंत्राटी लिपीक टंकलेखक व शिपाई यांना किमान वेतन अधिनियम १९४८ मधील तरतुदीनुसार वेतन, इतर सवलती व सेवा शर्ती लागु करणे बंधनकारक असेल.

१२. ज्या कंपनीस/संस्थेस काम सोपविण्यास येईल त्यांनी त्या बाबतच्या अटी व शर्ती नुसार करार करणे आवश्यक राहील.

१३. कंपनी/ संस्थेतर्फे काम करणा—या कर्मचा—यांचे सेवेचे कोणतेही उत्तरदायीत्व शासनावर किंवा कार्यालयावर राहणार नाही.

१४. सदरील निविदा शासनाकडुन प्रशासकिय मान्यता मिळाल्यानंतर ती अंमलात येईल.

१५. कंत्राटदारामार्फत दिल्या जाणा—या सेवा/सुविधा इत्यादीबाबतच्या कार्यपध्दतीचा व कामाचा आढावा कार्यालयामार्फत वेळोवेळी घेण्यात येईल व वेळोवेळी दिलेल्या सुचनांचे कोटेकोरपणे पालन करणे बंधनकारक राहिल.

१६. न्यायालयास कंत्राटी पध्दतीवर पुरविण्यात येणा—या सोई—सुविधा/यांचेसाठी जी कंत्राटी सेवा कंत्राटदारामार्फत उपलब्ध करुन देण्यात येणार आहे, त्याअनुषंगाने लागु असणारे सर्व कर कंत्राटदाराने अदा करावेत.

१७. कंत्राटदार संस्था/ कंपनी यांनी कंत्राटी सेवा उपलब्ध करुन देताना, शासन निर्णय विधी व न्याय विभाग यांच्या खालील शासन निर्णया नुसार सेवा उपलब्ध करून देणे बंधनकारक आहे.

१. शासन निर्णय विधी व न्याय विभाग कमांक पदनि २५१२/प्र.क्र.१५७/का.१२ दिनांक २६/२/२०१३,
२. वित्त विभाग शासन निर्णय कमांक पदनि—२०१३/प्र.क्र. ११२/१३/वित्तीय

सुधारणा—१ दिनांक २/१२/२०१३,

३. उदयोग उर्जा व कामगारविभाग शासन निर्णय कमांक काआआ—२०१३/प्र.क. २३३/कामगार—८ दिनांक १८/६/२०१४

४. विधी व न्याय विभाग शासन निर्णय, ३ सप्टेंबर,२०१४,

५. विधी व न्याय विभाग शासन निर्णय दि २७ जानेवारी, २०१५,

६. विधी व न्याय विभाग शासन शुध्दीपत्रक कमांक पदनि २५१२/प्र.क. १५७/का.१२ दिनांक ३/२/२०१५,

७. विधी व न्याय विभाग शासन निर्णय कमांक कंत्राटी—२०१६/प्र.क. १५७/का. १२, दि.२३ फेब्रुवारी २०१७

८. विधी व न्याय विभाग शासन निर्णय कमांक : कंत्राटी २०१६/प्र.क. १९४/का. १२ दि. ९ ऑगस्ट,२०१७

९. वित्त विभाग शसन परिपत्रक क.: पदनि—२०१६/प्र.क. २९/१६/वित्तीय सुधारणा—१ २ ऑगस्ट,२०१६.

१०. वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक—पदनि—२०२२/प्र.क्र १५/आ.पु.क दि. २७ एप्रिल,२०२२ या शासन निर्णयांच्या अधिन राहुन निविदा भरणेची आहे.

या मधील निर्देशांचे कोटेकोरपणे पालन करणे बंधनकारक आहे. तसेच भविष्यात वेळोवेळी शासनाकडून निर्गमीत होणारे शासन निर्णय बंधनकारक राहतील. सदर शासन निर्णय शासनाच्या htt://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

१८. उपरोक्त कामासाठी कंत्राटदारामार्फत ज्यांना काम देण्यात येणार आहे, त्यांना नियमित कर्मचा—यांप्रमाणे नियम व अटी व शर्ती लागू राहणार नाहीत. तसेच त्यांना नियमित कर्मचा—याप्रमाणे कोणतेही वेतन व भत्ते तथा अनुषंगिक लाभ अनुज्ञेय/लागु राहणार नाहीत, त्यांचा सेवा कालावधी किंवा कर्तव्य कालावधी व मानधनाबाबत हे कार्यालय कसल्याही प्रकरणे जबाबदार राहणार नाही.

१९. नियुक्ती प्राधिका—याने सुचविलेली सर्व कामे तसेच आयत्यावेळी कामाचे स्वरुप बदलल्यास त्याप्रमाणे कंत्राटदार संस्था/ कंपनी यांनी कामे करुन देणेचे त्यांचेवर बंधनकारक राहिल.

२०. कंत्राटदाराने कंत्राटी कामगार पुरविताना त्यात बाल कामगारांचा समावेश होणार नाही याची दक्षता घ्यावी.

२१. कंत्राटदाराने अर्जासोबत आवश्यक ती बयाणा रक्कम शासकीय नियमाप्रमाणे जमा करावी लागले.

२२. कंत्राटदाराने /संस्थेने/कंपनीने त्यांचे तांत्रीक निविदेतील सर्व कागदपत्राची साक्षांकित प्रत निविदेसोबत सादर करणे बंधनकारक आहे. सदर कागदपत्रे न जोडल्यास त्यांचा निविदा अर्ज रद्द ठरविण्यात येईल.

२३. कंत्राटदारास कंत्राटी कामाचा मोबदला अदा करताना त्यातुन नियमाप्रमाणे आयकर कापून घेण्यात येईल.

२४. कंत्राटी कामगारांनी कार्यालयात काम करताना त्यांच्या नजरेस ज्या काही बाबी येईल,

त्या कार्यालयीन बाबी आहेत यांची जाणीव ठेवून त्यासंबंधात आवश्यक ती गोपनियता ठेवणे, तसेच न्यायालयीन कामकाजात कोणत्याही प्रकारचा हस्तक्षेप होणार नाही याची दक्षता घेणे, याबाबी कंत्राटदारावर बंधनकारक राहतील.

२५. कंत्राटदारामार्फत नेमलेल्या कंत्राटी कामगारांकडुन सरकारी मालमत्तेचे नुकसान झालयाचे निदर्शनास आल्यास, नुकसान भरपाईची रक्कम कंत्राटदार यांना देय असलेल्या रक्कमेतून वसुल करणेत येईल.

२६. केवळ ई —निविदा भरतील म्हणून कंत्राटदार हक्क सांगता येणार नाही.

२७. ई निविदा पोर्टलवर बीड लॉक झाल्यानंतर निविदांबाबत हार्ड कॉपी एक प्रतीत कंत्राटदारांनी निविदा सादर करावयाच्या वेळेपासून ७२ तासात सादर करणे अनिवार्य आहे.

11/3

अध्यक्ष

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण जालना

# निविदा नमुना

निविदा मागविणा—या कार्यालयाचे नाव : जिल्हा विधी सेवा प्राधिकरण जालना

कामाचे स्वरुप : जिल्हा विधी सेवा प्राधिकरण जालना येथे दोन वर्षे मुदतीच्या कालावधीकरीता लिपीक व टंकलेखक व शिपाई यांची सेवा बाहययंत्रनेव्दारे कत्राटी पध्दतीने उपलब्ध करुन घेणे बाबत.

(सदर कामाची सविस्तर माहिती/अटी,शर्ती तसेच कामाचे स्वरुप दर्शविणारे विवरणत्र सोबत जोडले आहे.)

ई—निविदा क्रमांक : District Legal Services Authority, Jalna A-1 2025-2026

कंत्राटदार संस्थेचे/कंपनीचे नाव :

कंत्राटदार संस्थेचा/कंपनीचा संपूर्ण पत्ता :

कंत्राटदार संस्थेची /कंपनीचा संपर्क दुरध्वनी :

कंत्राटदार संस्थेचा /कंपनीचा नोंदणी क्रमांक :

कंत्राटदार संस्थेचा /कंपनीचा सेवा कर क्रमांक :

कंत्राटदार/ संस्थेने पुढील तक्त्याप्रमाणे माहिती भरुन दयावी

प्रपत्र :— १

| अ. क्र | न्यायालयाचे नाव | पदसंख्या | कंत्राटी सेवा पुरविणेसाठी कंत्राटदाराने मागणी केलेली एकून रक्कम (१ वर्षाकरिता खर्च रुपये ) | साधनसामग्री खर्च असल्यास रूपये वार्षिक खर्च | जी.एस.टी (१ वर्षाकरिता खर्च रुपये) | एकुन रक्कम रुपये (स्तंभ ४+५) | एकुन रक्कम रुपये अक्षरी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जालना | लिपीक टंकलेखक पदसंख्या — ४ | | | | | |
| २ | जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जालना | शिपाई पदसंख्या — १ | | | | | |
| | एकुन | | | | | | |

निविदेची दोन वर्षासाठी होणारी रक्कम : रुपये ——————————

(अक्षरी एकून रुपये )

(कंत्राटदाराचे नाव,सही,शिक्का,दिनांक)

(अ.क्र.४ ते ८ हया स्तंभातील माहिती कंत्राटदाराने भंरावयाची आहे.)

प्रपत्र :— २

कंत्राटदाराकडून मागणी करण्यात आलेला अतिकालीक भत्ता

| अ.क्र. | पद | अतिकालीक भत्याची रक्कम (प्रतितास) |
|---|---|---|
| ०१ | ०२ | ०३ |
| १. | लिपिल—टंकलेखक | |
| २. | शिपाई | |
| एकूण | | |

अ) स्तंभ क्र. ३ मधील माहिती कंत्राटदारांनी भरावयाची आहे.

ब) प्रपत्र—२ मध्ये कंत्राटदाराने स्तंभ २ मध्ये उल्लेख करण्यात आलेल्या पदांसाठी प्रतितास किती रक्कमेची मागणी करण्यात येत आहे ते नमूद करावे. उदा. लिपिक नि टंकलेखक/शिपाई च्या एका पदासाठी प्रतितास किती अतिकालीक भत्याची मागणी (ओवर टाईम) कंत्राटदार करणार आहे ते त्याने स्तंभ—३ मध्ये नमूद करणे अपेक्षित आहे.

क) कंत्राटदारांनी नमूद केलेली वेतनाची रक्कम व अतिकालीक भत्याची रक्कम किमान वेतन कायद्यातील तरतूदीपेक्षा कमी नसावी.

ड) कंत्राटदारांनी दरपत्रक भरतांना लिपिक—टंकलेखक तसेच शिपाई या पदांसाठी एका पदाचे एक महिण्याचे वेतन दर नमुद करावे, तसेच जे निविदाधारक वेगळे दर सादर करतील ते ग्राह्य धरण्यात येणार नाही.

..................

नियमित आस्थापनेवर नेमणुक झालेल्या कनिष्ठ लिपिक व शिपाई या पदावरील कर्मचारी यास प्रथम मिळणारे वेतनाची माहिती – माहे मार्च २०२५

| | |
|---|---|
| **Junior Clerk (Post-4)** | |
| Basic Pay | 19,900/- |
| Derness Allowance (D.A.) | 9,950/- |
| House Rent Allowance | 1800/- |
| Travelling Allowance (T.A.) | 675/- |
| D.C.P.S./N.P.S.<br>Basic Pay + D.A.x14% | 4,053/- |
| **Total Salary For One Month** | **36,378/-** |
| 4-Clerk – One month honorarium (Rs. 36,378 x 4) | 1,45,512/- |
| 4- Clerk – 12 month honorarium (Rs. 1,45,512 x 12) | 17,46,144/- |
| 4-Clerk – 24 month honorarium (Rs. 17,46,144 x24) | 34,92,288/- |
| **Peon-1** | |
| Basic Pay | 15,000/- |
| Derness Allowance (D.A.) | 7,500/- |
| House Rent Allowance | 1800/- |
| Travelling Allowance (T.A.) | 675/- |
| D.C.P.S./N.P.S.<br>Basic Pay + D.A.x14% | 3,150/- |
| **Total Salary For One Month** | **28,125/-** |
| 1-Peon – One month honorarium (Rs.28,125 x 1) | 28,125/- |
| 1- Peon – 12 month honorarium (Rs. 28,125 x 12) | 3,37,500/- |
| 1-Peon – 24 month honorarium (Rs.28,125 x 24) | 6,75,000/- |

Total : For Junior Clerk Rs.- 34,92,288/-
One Peon Rs.- 6,75,00/-

**Total Rs.- 41,67,288/-**